# सह्याद्रीला सांभाळू या, जोपासू या!

*माधव गाडगीळ, 9881153413, madhav.gadgil@gmail.com*

**पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाने विकास कार्यक्रमांवर काहीही ताठर बंधने सुचवलेली नाहीत.**

**पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाच्या निरनिराळ्या क्षेत्रांबाबतच्या सूचना ह्या एका पायथ्यापासून माथ्यापर्यंत नेटकेपणे पावले टाकणाऱ्या लोकशाही प्रक्रियेची सुरुवात करायला काही तरी आधार हवा म्हणून केलेल्या आहेत.**

***पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाच्या अहवालातून उद्धृत केलेली विधाने***

**आज जो ' विध्वंसक विकास व अविवेकी निसर्ग संरक्षण' अशा थाटातला कारभार चालू आहे त्या जागी पश्चिम घाट परिसरात एक पर्यावरण पूरक विकासाचा आदर्श निर्माण करण्यासाठी आपण झटले पाहिजे असा पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाचा आग्रह आहे. ह्या साठी विकास व निसर्ग संरक्षण ह्या दोन्हींचाही तपशील ठिकठिकाणची स्थानिक परिस्थिती विचारात घेऊनच ठरवला पाहिजे. स्थनिक जनतेला निर्णय प्रक्रियेत अर्थपूर्ण रीत्या सहभागी करून घेण्यातूनच हे साधू शकेल.**

**अतिशय संवेदनाशील (ESZ2), मध्यम संवेदनाशील (ESZ1), व कमी संवेदनाशील (ESZ3) अशा तीन टापूंच्या चौकटीत स्थनिक परिसराची व समाजाची वैशिष्ट्ये लक्ष्यात घेऊन, अगदी ग्राम सभांच्या पातळीवर जाऊन, निर्बंध तसेच प्रोत्साहनात्मक कार्यक्रमांचा तपशील ठरवण्यासाठी एक आरंभ बिंदू म्हणून पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाने काही सूचना मांडल्या आहेत. ह्या सूचना शासकीय अधिकारी, तज्ज्ञ, सामाजिक संघटना व नागरिकांशी भरपूर विचार विनिमय करून विकसित केल्या आहेत.**

**संवेदनशील परिसरक्षेत्रांची आखणी व व्यवस्थापन ह्यांची जबाबदारी केवळ शासकीय यंत्रणेवर पूर्णपणे सोपवणे योग्य नाही असा पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाचा अभिप्राय आहे. ह्या ऐवजी ग्राम पंचायतींच्या व पाणलोट क्षेत्रांचा नीट विचार करून संवेदनशील परिसरक्षेत्रांच्या सीमा (अभयारण्ये व राष्ट्रीय उद्याने तसेच युनेस्को वारसा स्थळांच्या संबंधातीलही) व तेथील निर्बंध तसेच प्रोत्साहनात्मक कार्यक्रमांचा तपशील हा स्थनिक जनता व ग्राम पंचायती, तालुका पंचायत समित्या, जिल्हा परिषदा व नगरपालिका ह्यांकडून येणाऱ्या सूचनांच्या आधारे ठरवण्यात यावा.**

**ह्या संदर्भात गोव्याच्या प्रादेशिक आराखडा बनवण्याची लोकाभिमुख प्रक्रिया हा एक चांगला पायंडा आहे. गोवा प्रादेशिक आराखडा बनवण्यासाठी तेथील तज्ञ गटाने गोव्यात जमिनीचा वापर आजमितीस कसा होत आहे ह्याची माहिती नीट संकलित केली व ह्या आधारे बनवलेले नकाशे व प्रस्ताव सर्व ग्राम पंचायती व नगरसभांपर्यंत पोचवले. मग तेथे ग्रामसभांतून – मोहल्लासभांतून बारकाईने चर्चा होऊन सूचना दिल्या गेल्या. ह्या साऱ्या संकलित केल्या गेल्या व ह्या विचारात घेऊन राज्यस्तरीय आराखडा तयार करण्यात आला.**

**९ जून २०१२ला, म्हणजे जैवविविधता कायदा मंजूर झाल्यावर तब्बल दहा वर्षांनी महाराष्ट्र राज्याने जैवविविधता मंडळ स्थापले व लोकांबरोबर विचारमंथन आयोजित केले. ह्या बैठकीत महाराष्ट्राचे वनमंत्री व वन सचिव ह्या दोघांनीही पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाच्या अहवालाबद्दल ढळढळीत दिशाभूल करणारी विधाने केली. माधव गाडगीळ याने जाहीर सभेत ही चूक दोघांच्याही नजरेस आणून दिली, तेव्हा माननीय वनमंत्र्यांनी लवकरच**

आपण मुख्य मंत्र्यांना भेटू या व ही सर्व प्रक्रिया रुळावर आणू या असे आश्वासन दिले. ह्यातून काहीही निष्पन्न झाले नाही, उलट महाराष्ट्र शासनातर्फे व विविध नेते- बाबू यांच्यातर्फे पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाच्या अहवालाबद्दल लोकांच्या मनात गोंधळ उडवून देण्याचा व अहवालाबद्दल त्यांचे मन कलुषित करण्याचा पद्धतशीर प्रयत्न चालूच राहिला आहे. हे लोकशाहीचे विडंबन न करता शासनाने खालील पावले उचलली असती तर तो मोठा शहाणपणा ठरला असता:

| कालावधि | सकारात्मक कृती |
|---|---|
| 3/10-8/11 | पश्चिम घाट परिसर तज्ज्ञ गटाच्या अहवालाची रचना |
| 1.9.11-30.11.11 | अहवालाचे सर्व राज्यांच्या भाषांत सुबोध अनुवाद, तसेच इंग्रजी अहवाल शासकीय संकेतस्थलावर चढवून इंग्रजी जाणणाऱ्या नागरिकांकडून अभिप्राय मागवणे |
| 1.12-11-31.5.12 | सर्व ग्रामसभांकडून अहवालातील प्राथमिक सूचनांच्या आधारे संवेदनशील परिसरक्षेत्रांच्या कोणत्या सीमा व प्रत्येक गावाच्या क्षेत्रात काय पद्धतीचे निर्बंध तसेच प्रोत्साहनात्मक कार्यक्रम स्वीकारार्ह आहेत ह्या संबंधी तपशीलवार अभिप्राय |
| 1.6.12-31.7.12 | ग्रामसभांकडून आलेल्या अभिप्रायांची, तसेच इंग्रजी जाणणाऱ्या नागरिकांकडून आलेल्या अभिप्रायांची जिल्हा नियोजन समित्या व जिल्या परिषदांकडून छाननी व आपापल्या शिफारसी पुरवणे |
| 1.8.12-30.9.12 | राज्य शासनांकडून जिल्हा नियोजन समित्या व जिल्या परिषदांकडून आलेल्या अभिप्रायांची, तसेच इंग्रजी जाणणाऱ्या नागरिकांकडून आलेल्या अभिप्रायांची छाननी व आपापल्या शिफारसी पुरवणे |
| 1.10.12-30.11.12 | केन्द्र शासनाने राज्य शासनांकडून तसेच इंग्रजी जाणणाऱ्या नागरिकांकडून आलेल्या अभिप्रायांची छाननी व पारदर्शकतेने अंतिम निर्णय घेणे – ह्या साठी जरूर वाटल्यास डॉ कस्तुरीरंगन् समितीसारखी समिती नेमणे |
| 1.12.12 | पश्चिम घाट प्रदेशात पर्यावरण पोषक व लोकाभिमुख विकास प्रक्रिया सुरू करणे, ह्यासाठी आवश्यक असल्यास एक पश्चिम घाट परिसर प्राधिकरणाची नियुक्ती करणे |

महाराष्ट्रात अपप्रचार चालू असताना माधव गाडगीळला२९ नोव्हेंबर २०१२ रोजी रत्नागिरीला एका महाविद्यालयात यावर खुलासा करण्यासाठी बोलावण्यात आले होते. आयत्या वेळी त्या महाविद्यालयावर दबाव आणून हे व्याख्यान रद्द करवण्यात आले. परंतु लवकरच, १५ डिसेंबर रोजी केरळात त्याला पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाच्या अहवलावर सविस्तर विवेचन करण्यास बोलावणे आले. तोवर केरळातही अपप्रचार चालू होता. पण त्याचे भाषण अनेकांनी काळजीपूर्वक ऐकले, नंतर वृत्तपत्रे व टी व्हीवर सर्व खुलासा नीट सांगण्यात आला. हे खुलेपणाने

समजावून घेऊन केरळातील अनेक राजकीय नेत्यांनी व नागरिकांनी अहवालावर पुनर्विचार करण्यास सुरुवात केली. २१ डिसेंबरला केरळ विधान सभेत पश्चिम घाट परिसर तज्ञ गटाच्या अहवालावर चर्चा झाली. ह्या चर्चेत अनेक आमदारांनी ह्या अहवालाचे समर्थन केले व ह्या अहवालाचा काळजीपूर्वक विचार करून एका लोकशाही प्रक्रियेतून सुव्यवस्थित निर्णय घ्यावे असे ठरवण्यात आले.

हे जसे केरळात घडले, तसेच महाराष्ट्रात घडेल अशी आशा आहे. आता तरी महाराष्ट्र शासनाने ह्या अहवालाचा एक वस्तुनिष्ठ गोषवारा सह्यप्रदेशातील सर्व ग्रामसभांपर्यंत पोचवावा. ग्रामसभांकडून अहवालातील प्राथमिक सूचनांच्या आधारे संवेदनशील परिसरक्षेत्रांच्या कोणत्या सीमा व प्रत्येक गावाच्या क्षेत्रात काय पद्धतीचे निर्बंध तसेच प्रोत्साहनात्मक कार्यक्रम स्वीकारार्ह आहेत ह्या संबंधी तपशीलवार अभिप्राय मागवावे. मग लोकमताचा नीट आदर करून ह्या अहवालावर पुढे काय पावले उचलावीत ह्याबद्दल निर्णय घ्यावे हेच उचित आहे.

असे केल्यास काय घडेल ह्याचा कोकणातील काही लोकांनीच विचार करून एक पत्रक काढले आहे; ते म्हणते:

| अपप्रचार | वास्तव |
|---|---|
| गाडगीळ अहवाल अमलात आणला तर कोकणाचा विकास थांबेल. | वरील विधान म्हणजे कोकणी माणसाची दिशाभूलच. कारण अहवाल म्हणतो की कोकणी जनतेच्या सहभागाने आणि सहमतीने; जनतेला हवा तसा व हवा तिथे विकास होणारच. |
| रस्ते बांधता येणार नाहीत. | धादांत खोटे. कोकणी जनसामान्यांच्या सोयीसाठी, त्यांच्या गरजेनुसार रस्ते होणार. पण बाबू,नेते,आणि ठेकेदारच्या तुंबड्या भरण्यासाठी रस्ते होणार नाहीत. |
| घरे बांधता, वाढविता , दुरुस्त करता येणार नाहीत. | अफवांचे पीक: स्थानिक जनतेला गरजेनुसार घरांचे बांधकाम, दुरुस्ती करायला कोणतीही आडकाठी नाही. मात्र माजलेले नेते,त्यांचे चेले-चमचे,धनदांडगे,ठेकेदार यांना नद्या,ओढे,खाड्या, हिरवे डोंगर,समुद्र ओरबाडून महाल वा फार्म हाउसेस बांधता येणार नाहीत की इस्टेटहि करता येणार नाहीत. |
| उद्योगधंदे न आल्यामुळे कोकणात बेरोजगारी, गरिबी वाढेल. | नक्कीच नाही. प्रदूषण न करणाऱ्या, स्वच्छ कोकणातल्या सुंदर निसर्गाच्या  वारशाचा मान राखून चालणाऱ्या उद्योगांना, शिक्षणविषयक प्रकल्पांना, हरित तंत्रज्ञानावर आधारलेल्या व्यवसायांना मान्यता.इतकेच नव्हे, तर निसर्ग संवर्धनासाठी रोजगार हमीतून भरपूर संधींना वाव! |

| | |
|---|---|
| **कोकणात कोणतेही चांगले प्रकल्प होऊच शकणार नाहीत.** | **विनाशकारी प्रकल्प होणार नाहीत! कुक्कुट पालन , शेळीपालन, दुग्धव्यवसाय इ. सारखे पशुपालन प्रकल्प, नारळ, आंबे, काजू, कोकम, फणस, करवंद इ. वर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगधंद्यांना, सेंद्रिय शेतीला, बायोगॅस निर्मितीला, फळबागा, वृक्षशेतीला प्रोत्साहन देणार. पण आंबे, काजुंच्या बागांची राख करणारे औष्णिक वीज प्रकल्प येणार नाहीत. समुद्र, खाड्या, नद्यांमध्ये मत्स्योपादन वाढावे यासाठी विशेष प्रयत्न करणार.या उलट समुद्र, खाडीचे गटार करून, त्यात गरम पाणी सोडून मच्छिमारांच्या तोंडचा घास हिरावून घेणारे प्रदूषणकारी रासायनिक कारखाने व प्रकल्प येणार नाहीत.** |
| **खनिज उद्योग न आल्यामुळे कोट्यवधीचा महसूल बुडेल.** | **कोकणच्या डोळयात,केवढी ही धूळफेक! रेडी, कळण्यात लोह आणि मँगनीजच्या खाणींमुळे धुळीचे साम्राज्य पसरले.धडधाकट मुले-माणसे फुफुसाच्या विकारांनी त्रस्त झाली.अशा खाणी कुणाला हव्यात? त्याचा महसूल मंत्र्या संत्र्यांच्या खिशात जातो.त्रास मात्र जनतेला होतो. म्हणून अहवाल म्हणतो की कोकणातली जमीन पोखरणाऱ्या खाणी नकोत.पण गावकऱ्याच्या गरजेनुसार घर बांधकामासाठी चिरे, वाळू पुरवठा नक्कीच होणार.** |
| **पर्यटन उद्योगाला बाधा येईल.** | **साफ चूक! घरगुती कोकणी पाहुणचारामार्फत पर्यटन वाढीला प्रोत्साहन देणार. मात्र समुद्र किनारे, टेकड्या ताब्यात घेऊन स्थानिक जनतेला वहिवाटीचा हक्क नाकारणाऱ्या पंचतारांकित पर्यटन धंद्यावर गदा येणार.** |
| **कोकणासारख्या मागास प्रदेशाला अहवालातील बंधने परवडणार नाहीत.** | **जिथे भूकबळी गेले नाहीत, शेतकऱ्यानी आत्महत्या केल्या नाहीत, शेतमालाच्या दरासाठी जाळपोळ, गोळीबार झाले नाहीत अशा कोकणाला मागास म्हणणे हा तर बिनडोकपणाचा कळसच! कोकणी माणसाविषयी आपल्याला काळजी असल्याचे ढोंग करणाऱ्या भल्या भल्या नेते मंडळींनी कोकणा विषयीचा हा अहवाल धड वाचलेलाच नाही. तो समजून- उमजून वाचणाऱ्याच्या आपसूकच लक्षात येईल कि अहवालाचा विकासाला विरोध नाही.तर लालसेला आहे.इथल्या संसाधनाची हाव बाळगून लुट करू पाहणाऱ्याना विरोध आहे.कायदेशीर मार्गाने नैतिकतेला धरून विकासाची दिशा हा अहवाल दाखवतो आहे.कोकणाचे व्यवस्थापन आणि विकास कोकणी माणसाच्या हातात सोपवतो आहे.** |